
जनसंपर्क कक्ष

2 1 FEB 2018 **पुढारी** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात शिवजयंती उत्साहात

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठात शिवजयंती मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते शिवपुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. शिवजयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठातील वातावरण सकाळपासूनच उत्साही आणि आनंदी होते. विद्यापीठाच्या प्रांगणात मोठी रांगोळी घालण्यात आली होती. सकाळी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते शिवपुतळ्यास अभिवादन करण्यात येऊन ध्वजवंदन करण्यात आले. त्यानंतर सामूहिक राष्ट्रगीत व वंदे मातरम् म्हणण्यात आले. यानंतर कवठेसार (सांगली) येथील जय हनुमान तरुण मंडळाने मर्दानी खेळ व दांडपट्ट्याचे सादरीकरण केले. यावेळी शिवाजी महाराजांच्या जयघोषासह लेझीम, ढोल-ताशांच्या गजराने विद्यापीठ परिसर दणाणून गेला. सायंकाळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी पन्हाळगडावरून आणलेल्या शिवज्योतीचे स्वागत केले. विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसमोर राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी जागर शिवरायांचा हे पथनाट्य सादर केले. यावेळी विद्यार्थी, विद्यार्थिनींबरोबरच शिवप्रेमी जनता मोठ्या संख्येने उपस्थित होती. सायंकाळी विद्यार्थ्यांनी दिवे प्रज्वलित करून शिवपुतळ्याचा परिसर उजळून टाकला. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी.आर. मोरे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, अधिष्ठाता डॉ. पी.एस. पाटील, डॉ. ए.एम. गुरव, डॉ. पी. डी. राऊत, राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड यांच्यासह शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, सेवक तसेच विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, कुलगुरू डॉ. शिंदे यांनी सकाळी मुंबई विद्यापीठातील शिवजयंती समारंभात सहभाग घेतला. त्यानंतर सायंकाळी शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणातील शिवपुतळ्यास अभिवादन करण्यासाठी दाखल झाले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी पन्हाळगडावरून आणलेल्या शिवज्योतीचे स्वागत करून शिवछत्रपतींच्या पुतळ्यास कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्यासह मान्यवर व विद्यार्थ्यांनी अभिवादन केले.**

2 1 FEB 2018

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात शिवजयंतीचा जल्लोष



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात शिवजयंतीनिमित्त उपस्थित मान्यवर.

कोल्हापूर, ता. २० : शिवाजी विद्यापीठात शिवजयंती साजरी झाली. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी शिवपुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

विद्यापीठाच्या प्रांगणात रांगोळी घातली होती. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी शिवपुतळ्यास अभिवादन करून ध्वजवंदन केले. यानंतर सामूहिक राष्ट्रगीत, वंदे मातरम् म्हटले. कवठेसार (सांगली) येथील जय हनुमान तरुण मंडळाने मर्दानी खेळ, दांडपट्ट्याचे सादरीकरण केले. सायंकाळी कुलगुरू डॉ. शिंदे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी पन्हाळगडावरून आणलेल्या शिवज्योतीचे स्वागत केले. विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसमोर राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी 'जागर शिवरायांचा' पथनाट्य सादर केले. सायंकाळी विद्यार्थ्यांनी दिवे प्रज्वलित केल्यावर शिवपुतळ्याचा परिसर उजळून निघाला. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, प्रभारी वित्त आणि लेखाधिकारी अजित चौगुले, अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील, डॉ. ए. एम. गुरव, डॉ. पी. डी. राऊत, राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कुलगुरू डॉ. शिंदे यांनी सकाळी मुंबई विद्यापीठातील शिवजयंती समारंभात सहभाग घेतला. यानंतर सायंकाळी शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणातील शिवपुतळ्यास अभिवादन करण्यासाठी ते आले. विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक आणि दीपोत्सव हे कार्यक्रम उत्साही वातावरणात झाले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 FEB 2018
तरुण भारत


# पथनाट्यातून केला 'जागर शिवरायांचा'

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी 'जागर शिवरायांचा' हे पथनाट्य सादर करून शिवरायांना अभिवादन केले. कवठेसार (सांगली) येथील जय हनुमान तरुण मंडळाने मर्दानी खेळ व दांडपट्ट्यांचे सादरीकरण केले. लेझीम, ढोल ताश्यांच्या गजरात पन्हाळा येथून आणलेल्या शिवज्योतीचे स्वागत करण्यात आले. शिवाजी महाराज यांच्या जयघोषाने विद्यापीठ परिसर दुमदुमला होता.

**शिवाजी विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांचा उपक्रम**

यावेळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरु डॉ. डी.टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील, डॉ. ए. एम. गुरव, डॉ. पी. डी. राऊत, राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. डी.के. गायकवाड, क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थिनींबरोबर कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे.

21 FEB 2018
महाराष्ट्र टाईम्स
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# व्याख्यान, धान्य वाटप, प्रतिमापूजन

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

संयुक्त मंगळवार पेठ येथे शिवजयंती साजरी करण्यात आली. यानिमित्त कृष्णात उर्फ भिकाजी मगदूम यांचे व्याख्यान झाले. मिरजकर तिकटीला छत्रपती शिवरायांचा १०० फूट उंचीचा डिजिटल फलक क्रेनव्दारे उभारण्यात आला होता. प्रशांत जाधव, उमेश पोवार यांनी भागातील शिवभक्तांना भगवे ध्वज वितरण केले.

परिसरातील सर्व घरांवर भगवे ध्वज लावण्यासाठी शिवभक्त राजू वर्णे यांनी ध्वज वाटप केले. शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन बाबुराव चव्हाण, डॉ. अभय कोटकर, संदीप सरनाईक, संजय रणदिवे, हर्षल सुर्वे यांच्याहस्ते झाले. उद्योगपती संदीप पाटील, राजू लिंग्रज, संग्राम साळोखे यांच्याहस्ते जिलेबी वाटप करण्यात आले. युवराज पाटील, कुणाल शिंदे, निकलेश गायकवाड, अमोल गायकवाड, सुहास भोला यांनी अंधशाळेतील विद्यार्थ्यांना जिलेबीचे वाटप केले. मिरजकर तिकटीतील शिवरायांच्या पुतळयाचे पूजन करण्यात आले. शिवसेनेचे संजय पवार, अशोक धुमाळ, एस. वाय. सरनाईक, संभाजी जगदाळे आदी उपस्थित होते.

शिवशक्ती प्रतिष्ठानतर्फे बालकल्याण संकुलाला जीवनावश्यक वस्तू, धान्य, किराणा मालाचे साहित्य देण्यात आले. प्रतिष्ठानचे धनाजी जाधव, आनंदा ढकरे, कैलास दुधनकर उपस्थित होते. दलित इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्रीजतर्फे शिवजयंती साजरी करण्यात आली. उद्योजक विलास पाटोळे यांचे भाषण झाले. राजेंद्र चौगुले, प्रविण कांबळे, विलास पाटोळे उपस्थित होते. न्यू प्राथमिक विद्यालयात मुख्याध्यापिका एस. आर. पाटील यांच्याहस्ते प्रतिमा पूजन झाले.



शिवाजी विद्यापीठाच्यावतीने शिवजयंती साजरी करण्यात आली. यावेळी पारंपरिक वेशभूषेत विद्यार्थी सहभागी झाले होते.



शिवजयंतीनिमित्त काँग्रेस कमिटीमध्ये आयोजित कार्यक्रमात शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

## विविध संस्था, संघटनांतर्फे शिवजयंती उत्साहात

निवृत्ती चौकात शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. संजय कुलकर्णी, राजेश मेथे आदी उपस्थित होते. भारिप बहुजन महासंघातर्फे शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास भगवान राजपाल यांच्याहस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. संजय गुदले, राजन पिडाळकर यांची भाषणे झाली..

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियातर्फे शिवजयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्रा. शहाजी कांबळे यांनी मार्गदर्शन केले. देशभक्त सामाजिक सेवा संस्थेतर्फे आयोजित कार्यक्रमात अमित नागटिळे यांचे भाषण झाले. श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसतर्फे आयोजित कार्यक्रमात डी. बी. पाटील यांच्याहस्ते प्रतिमा पूजन झाले.

शिवाजी विद्यापीठात शिवजयंती उत्साही वातावरणात साजरी करण्यात आली. कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्याहस्ते शिवपुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरु डॉ. डी.टी. शिर्के उपस्थित होते. त्यानंतर सामूहिक राष्ट्रगीत व वंदे मातरम् गीत सादर करण्यात आले. कवठेसार (सांगली) येथील जय हनुमान तरुण मंडळाने मर्दानी खेळ व दांडपट्ट्याचे सादरीकरण केले. शिवाजी महाराजांच्या जयघोषासह लेझीम, ढोल-ताशांच्या गजराने विद्यापीठ परिसर दणाणून गेला. सायंकाळी कुलगुरू डॉ. शिंदे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी पन्हाळगडावरुन आणलेल्या शिवज्योतीचे स्वागत केले. मुख्य इमारतीसमोर राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी जागर शिवरायांचा हे पथनाट्य सादर केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील छत्रपती शिवाजी सभागृहात पालकमंत्री चंद्रकांत पाटील, जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार यांच्याहस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी संजय शिंदे, जिल्हा पुरवठा अधिकारी विवेक आगवणे, जिल्हा नियोजन अधिकारी सरिता यादव, प्रांताधिकारी सचिन इथापे, तहसीलदार उत्तम दिघे, जिल्हा प्रशासन अधिकारी नितीन देसाई, नायब तहसीलदार अपर्णा मोरे उपस्थित होते.

जिल्हा काँग्रेस कमिटीतर्फे आयोजित कार्यक्रमात माजी आमदार पी. एन. पाटील, माजी महापौर प्रल्हाद चव्हाण यांच्याहस्ते प्रतिमापूजन झाले. प्रकाश सातपुते, तौफिक मुल्लाणी, संध्या घोटणे, चंदा बेलेकर, रंगराव देवणे, अन्वर शेख, नितीन शेख आदी उपस्थित होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जिल्हा मध्यवर्ती जयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष सखाराम कामत यांच्याहस्ते प्रतिमा पूजन झाले. यावेळी प्रा. विश्वास देशमुख, उत्तम कांबळे उपस्थित होते.

मीनाताई ठाकरे व अवनि संस्थेतर्फे 'निरुपयोगी प्लास्टिकमुक्त परिसर व प्लास्टिकमुक्त शाळा' या संकल्पनेवर आधारित फेरी काढण्यात आली. मुख्याध्यापक सरदार पाटील, जैनुद्दीन पन्हाळकर, विक्रांत जाधव उपस्थित होते.

21 FEB 2018
लोकमत

# विद्यापीठात शिवजयंती उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क


**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात शिवजयंती सोमवारी (दि. १९) उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते शिवपुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

शिवजयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठातील वातावरण सकाळपासूनच उत्साही आणि आनंदी होते. विद्यापीठाच्या प्रांगणात मोठी रांगोळी घालण्यात आली होती. सकाळी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते शिवपुतळ्यास अभिवादन आणि ध्वजवंदन करण्यात आले. त्यानंतर सामूहिक राष्ट्रगीत, वंदे मातरम् म्हणण्यात आले. यानंतर कवठेसार (सांगली) येथील जय हनुमान तरुण मंडळाने मर्दानी खेळ व दांडपट्ट्याचे सादरीकरण केले. यावेळी शिवरायांचा जयघोष आणि लेझीम, ढोल-ताशांच्या गजराने विद्यापीठाचा परिसर दणाणून गेला. सायंकाळी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या (एनएसएस) विद्यार्थ्यांनी पन्हाळगडावरुन आणलेल्या शिवज्योतीचे स्वागत केले. विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसमोर 'एनएसएस'च्या विद्यार्थ्यांनी 'जागर शिवरायांचा हे पथनाट्य सादर केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 FEB 2018
तरुण भारत

# आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या अधिसभेवर डॉ. जयप्रकाश रामानंद

**कोल्हापूर :** राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.जयप्रकाश रामानंद यांची महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या अधिसभेवर (सिनेट) नियुक्ती झाली आहे. ही नियुक्ती शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.देवानंद शिंदे यांनी केली. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ (नाशिक) यांचे कार्यक्षेत्र संपूर्ण राज्य असल्याने या विद्यापीठाच्या अधिसभेवर नियुक्त होणे मानाचे समजले जाते. या विद्यापीठाशी वैद्यकीय क्षेत्राशी निगडीत ३२५ हून अधिक महाविद्यालये संलग्नित आहेत. हे राज्यस्तरीय विद्यापीठ असून ८ पारंपरिक विद्यापीठातून प्रत्येकी एक सदस्याची नियुक्ती अधिसभेवर केली जाते. डॉ.रामानंद यांनी वैद्यकीय महाविद्यालय व छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालयासाठी दिलेल्या भरीव योगदानाची दखल घेऊन नियुक्ती केली. नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या निवडणुकीमध्येही डॉ.रामानंद यांची विद्यापीठाच्या पदवीपूर्व व पदव्युत्तर अभ्यासमंडळावर बिनविरोध निवड झाली असल्याची माहिती पत्रकाद्वारे दिली आहे.



जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 FEB 2018
महाराष्ट्र टाईम्स

# शिवाजी विद्यापीठात अवयवदान संकल्प

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या २२ विद्यार्थिंनी आणि ७० विद्यार्थ्यांनी अवयवदानाचा संकल्प केला. यावेळी औरंगाबाद येथील राजेशसिंह सूर्यवंशी आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड उपस्थित होते. शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि औरंगाबाद यूथ सोशल वेलफेअर फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र विभागात कार्यक्रम झाला.

जनसंपर्क कक्ष
21 FEB 2018 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'मराठा इतिहास लेखनासाठी मोडीचे ज्ञान आवश्यक'

कोल्हापूर, ता. २० : मराठा इतिहास लेखनासाठी मोडीचे ज्ञान आवश्यक असल्याचे प्रतिपादन औरंगाबाद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे मोडी पंडित मच्छिंद्र चौधरी यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्रातर्फे आयोजित १२ दिवसीय मोडी प्रमाणपत्र अभ्यासक्रम व ॲडव्हान्स मोडी प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. केंद्राच्या समन्वयक डॉ. नीलांबरी जगताप यांनी केंद्रामार्फत चालविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. मोठ्या संख्येने मोडी जाणणारे संशोधक निर्माण झाल्याखेरीज अभ्यासासाठी उपलब्ध असणाऱ्या मराठेकालीन कागदपत्रांचे वाचन होणार नाही, असे सांगितले. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी व संशोधकांनी तसेच इतिहासप्रेमींनी या अभ्यासक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. जगताप यांनी केले. इतिहास विभागप्रमुख डॉ. नंदा पारेकर यांनी मोडी प्रशिक्षणाचे औपचारिक उद्घाटन केले. या वेळी डॉ. अवनिश पाटील उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
21 FEB 2018 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात मोडी लिपी कार्यशाळेचे उद्घाटन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्रातर्फे आयोजित १२ दिवसीय मोडी प्रमाणपत्र व ॲडव्हान्स मोडी प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे उद्घाटन केले. समन्वयक डॉ. नीलांबरी जगताप यांनी याची माहिती दिली. औरंगाबाद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील मोडीचे अभ्यासक पंडित चौधरी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थी, संशोधक तसेच इतिहासप्रेमींनी या अभ्यासक्रमाचा लाभ घ्यावा, असे आव्हानही त्यांनी केले. यावेळी इतिहास विभाग प्रमुख डॉ. नंदा पारेकर, डॉ. अवनिश पाटील उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 1 FEB 2018
पुढारी

# शिवाजी विद्यापीठामध्ये मराठी विज्ञानकथा लेखन कार्यशाळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ मराठी विभाग आणि मराठी विज्ञान परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ६ ते ८ मार्च २०१८ या कालवधीत मराठी विज्ञान कथा लेखन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेमध्ये मान्यवर कथालेखक नवोदितांना कथालेखनाविषयी मार्गदर्शन करणार आहेत.

यशवंत देशपांडे, माधुरी शानभाग, मोना चिमोटे, शिरीष गोपाळ देशपांडे, सुधा रिसबूड व शिवाजीराव पवार यांना मार्गदर्शक म्हणून निमंत्रित करण्यात आले आहे. कार्यशाळेला निवडक तीस नवोदित लेखकांना सहभागी करून घेण्यात येणार आहे.

सहभागी नवोदितांना प्रारंभी प्रतिथयश विज्ञान लेखकांच्या २-२ कथा वाचायला दिल्या जातील. त्या वाचून त्या विद्यार्थ्यांनी एकेक कथा लिहायची आहे. कार्यशाळा शिवाजी विद्यापीठाच्या रामानुजन सभागृहात सकाळी ११ ते ३ या वेळेत आयोजित केली आहे. इच्छुकांनी मराठी विभागाचे डॉ. नंदकुमार मोरे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

21 FEB 2018
सकाळ

# विद्यापीठात मराठी विज्ञान कथा लेखन कार्यशाळा

कोल्हापूर, ता. २० : शिवाजी विद्यापीठाचा मराठी विभाग आणि मराठी विज्ञान परिषद, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने तीनदिवसीय मराठी विज्ञान कथा लेखन कार्यशाळा आयोजित केली आहे. ६ ते ८ मार्चदरम्यान कार्यशाळा होईल. शिवाजी विद्यापीठाच्या रामानुजन सभागृह, गणित विभागात सकाळी अकरा ते दुपारी तीन या वेळेत कार्यशाळा होईल. या कार्यशाळेत मान्यवर कथालेखक नवोदितांना कथालेखनाविषयी मार्गदर्शन करतील. यात यशवंत देशपांडे, माधुरी शानभाग, मोना चिमोटे, शिरीष गोपाळ देशपांडे, सुधा रिसबूड व शिवाजीराव पवार यांना मार्गदर्शक म्हणून निमंत्रित करण्यात आले आहे. कार्यशाळेला निवडक ३० नवोदित लेखकांना सहभागी करून घेण्यात येईल. या कार्यशाळेसाठी विद्यार्थ्यांचे तीन गट पाडले जाणार आहेत. प्रत्येक गटाबरोबर दोन-दोन तज्ज्ञ असतील. हे तज्ज्ञ नव्याने लिहिलेल्या कथांसंबंधी मार्गदर्शन करणार आहेत. इच्छुकांनी मराठी विभागाचे डॉ. नंदकुमार मोरे यांच्याशी संपर्क साधावा.

21 FEB 2018
लोकमत

# मराठी विज्ञानकथा लेखन कार्यशाळेचे आयोजन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा मराठी विभाग आणि मुंबईतील मराठी विज्ञान परिषदतर्फे दि. ६ ते ८ मार्चदरम्यान 'मराठी विज्ञानकथा लेखन कार्यशाळा' आयोजित केली आहे. यामध्ये कथालेखक यशवंत देशपांडे, माधुरी शानभाग, मोना चिमोटे, शिरीष गोपाळ देशपांडे, सुधा रिसबूड व शिवाजीराव पवार, आदी मार्गदर्शन करतील. कार्यशाळेत निवडक ३0 नवोदित लेखकांना सहभागी करून घेण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी इच्छुकांनी डॉ. नंदकुमार मोरे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन विद्यापीठातील मराठी विभागप्रमुख डॉ. राजन गवस यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
21 FEB 2018 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डिजिटल माध्यमे वापरा : चेचर

कोल्हापूर, ता. २० : मुद्रितकडून डिजिटलकडे झालेला माध्यमांचा प्रवास लक्षात घेऊन तरुणांनी डिजिटल माध्यमांवर विशेष भर दिला पाहिजे, असे प्रतिपादन 'सकाळ'चे छायाचित्रकार बी. डी. चेचर यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभाग, तसेच एम.ए. मास कम्युनिकेशन विभागातर्फे आयोजित दोनदिवसीय वेब पत्रकारिता कार्यशाळेत ते बोलत होते. विभागाचे सहायक प्राध्यापक डॉ. शिवाजी जाधव अध्यक्षस्थानी होते.

वेब माध्यमांसाठी व्हिडिओ या विषयावर चेचर म्हणाले, की माध्यमांची स्थिती बदलत आहे. त्यानुसार माध्यमात काम करणाऱ्या सर्वच घटकांनी स्वतःला बदलले पाहिजे. डिजिटल माध्यमांत व्हिडिओचे स्थान अढळ आहे. नवे विषय जगभरातील दर्शक-श्रोते आणि वाचकांना हवे आहेत. ते देण्याचा प्रयत्न करावा. आपल्या अवतीभोवती घडणाऱ्या घटना चित्रबद्ध करून व्यापक लोकसमूहापर्यंत पोचविण्यासाठी डिजिटल मीडिया मदत करीत आहे. यासाठी या माध्यमांचा अभ्यास करणे क्रमप्राप्त आहे. या वेळी रविराज गायकवाड यांनीही मार्गदर्शन केले. साईप्रसाद महेंद्रकर आणि सोनम बाबर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सुमेधा साळुंखे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 FEB 2018
तरुण भारत

# विद्यापीठात वेब पत्रकारिता विषयावर कार्यशाळा उत्साहात

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभाग व एम. ए. मास कम्युनिकेशन विभागाच्या वतीने आयोजित दोन दिवसीय वेब पत्रकारिता कार्यशाळेचे उद्घाटन मंगळवारी झाले. अध्यक्षस्थानी सहायक प्राध्यापक डॉ. शिवाजी जाधव होते. या कार्यशाळेत वेब मीडिया व 'वेब माध्यमांसाठी व्हिडिओ' या दोन विषयावर विविध मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रास्ताविक विद्यार्थी साईप्रसाद महेंद्रकर आणि विद्यार्थीनी सोनम बाबर यांनी केले. डॉ. सुमेधा साळुंखे यांनी आभार मानले.

21 FEB 2018
महाराष्ट्र टाईम्स

## पालक मेळावा

**कोल्हापूर :** स्पर्धेच्या युगात शिक्षण प्रक्रियेतील अमूलाग्र बदल होत असताना पालक व विद्यार्थ्यांसोबत संवाद व्हावा यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागात पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. मेळाव्यामुळे पालक-शिक्षक-विद्यार्थी यांच्यात विचाराची देवाण-घेवाण होऊन मुलांच्या व्यक्तिमत्व विकास, नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार तसेच पालक मेळाव्यासाठी असलेल्या सर्व उपस्थितांना महाविद्यालयात उपलब्ध असलेल्या सुविधा व विविध उपक्रमांबाबत माहिती संचालक डॉ. जयदीप बागी यांनी दिली. सूत्रसंचालन मेकॅनिकल डिपार्टमेंटचे सहायक प्रा. एस. बी. काळे यांनी केले. प्रशासकीय समन्वयक डॉ. ए. के. साहू यांनी आभार मानले.

21 FEB 2018 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कोरे इंजिनिअरिंग विद्यापीठ परीक्षेत अव्वल

## १३ विद्यार्थी गुणवत्ता यादीत; स्वप्नील भगत सिव्हिल विभागात प्रथम

**सकाळ वृत्तसेवा**

वारणानगर, ता. २० : शिवाजी विद्यापीठ परीक्षेत तात्यासाहेब कोरे अभियांत्रिकीच्या, सिव्हिल विभागात ०५, केमिकल ०३, इलेक्ट्रॉनिक्स ०२, मेकॅनिकल ०१, बायोटेक ०१, इंन्फोर्मेशन टेक्नॉलॉजी ०१ असे एकूण १३ विद्यार्थी विद्यापीठ गुणवत्ता यादीत झळकले व सलग ३५ वर्षांनंतर तंत्रशिक्षणातील उच्च गुणवत्तां, दर्जा व सातत्यं पुन्हा एकदा अधोरेखित केले.

परीक्षेत सिव्हिल विभागाचा स्वप्नील भगत हा ८२.५६ टक्के गुण मिळवून प्रथम, तर याच विभागातील शरयू जोशी (८०.३८ टक्के द्वितीय, योगेश कदम (७८.८८ टक्के) व शिवानी तांबडे (७८.८८ टक्के) यांनी सातवा, तर स्नेहल पाटील (७८.०९ टक्के) हिने दहावा क्रमांक मिळवला. केमिकल विभागात, सुमित ऐतवडेने (८१.४४ टक्के) तृतीय, शार्दुलकुमार शिंदे (७७.८१ टक्के) सहावा तर अभिषेक पाठक (७६.०६ टक्के) ने नववा क्रमांक पटकावला. इलेक्ट्रॉनिक्समध्ये, प्रियांका कुंभार (८०.१९ टक्के) हिने दुसरा, तर अनिल बंडगर (७९.१३ टक्के) ने पाचवा रँक मिळवला. जोशी प्राजक्ता (७६.३१ टक्के) हिने मेकॅनिकल विभागातून आठवा, इनामदार अप्पालाल (७५.८७ टक्के) याने बायोटेकमध्ये नववा, तर ओंकार वनारसे (७९.७८ टक्के याने इंन्फोर्मेशन टेक्नोलॉजी विभागातून विद्यापीठात दुसरा क्रमांक मिळवला. वारणा विविध उद्योग व शिक्षण समूहाचे प्रमुख डॉ. विनय कोरे यांनी सत्कार व कौतुक केले. पॉलिटेक्निकचे प्राचार्य, प्रा. बी. व्ही. बिराजदार, प्राचार्य, डॉ. एस. व्ही. आणेकर, प्रा. एल. बी. पटकुरे, प्रा. एस. ए. देसाई, प्रा. डी. जी. चौगुले, प्रा. एन. एस. हनमापुरे, प्रा. ए. जी. पाटील आदींचे मार्गदर्शन लाभले.